क्रमांक : अॅकब्यु/अे–३/अंतर्गत दूरध्वनी/ नेट सेवा/२०१७/ 5267
अॅन्टी करप्शन ब्युरो,महाराष्ट्र राज्य,मुंबई,वरळी पोलीस कॅम्प,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई – ४०० ०३०.
ANTI CORRUPTION BUREAU, M.S., MUMBAI, WORLI POLICE CAMP,
SIR POCHKHANWALA ROAD, WORLI, MUMBAI - 400 030.
Phone No. 24921212 (Ex.), Toll Free No.1800 22 2021.
web site : www.acbmaharashtra.gov.in
Date -30/05/2017.

## –: दरपत्रकाबाबत सुचना :–

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई या कार्यालयात अंदाजे ९६ अंर्तगत व ५ थेट दुरध्वनी कनेक्शन असून सदरचे कनेक्शन पॅनासॉनिक सिस्टीम नेटवर्क कंपनीचे मॉडेल–KX-TS500MX(B) कार्यरत आहेत. तसेच इंटरनेट कनेक्शन देखील सहा मजली इमारतीमध्ये कार्यान्वीत आहेत.

सदरची अंर्तगत दुरध्वनी/नेट सेवा सुस्थितीत ठेवण्यासाठी वार्षिक देखभाल करार करावयाचा असल्याने इच्छूक पुरवठादार कंपनीकडून कॉम्प्रीहेन्सिव्ह तसेच नॉन–कॉम्प्रीहेन्सिव्ह मोहरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत. याबाबतच्या अटी व शर्तीचा सविस्तर तपशील पुढील प्रमाणे आहेत.

१. सिलबंद दरपत्रके दि. ०९.०६.२०१७ रोजी कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी ०५:०० वाजे पर्यंत या कार्यालयात जमा करावीत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. मोहरबंद लिफाफ्यांवर “अंतर्गत दुरध्वनी सेवा/ इंटरनेट सर्व्हिस दरपत्रके” असे लिहीणे आवश्यक आहे. ग्राहय धरण्यात येणार नाही. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रकधारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. दरपत्रक मोहरबंद लिफाफे उघडतेवेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एक प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतो.

५. दरपत्रक कागदपत्राात कोठेही खाडाखोड ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास त्यावर पुर्ण स्वाक्षरी करावी.

६. दरपत्रक धारक कंपनींनी या कार्यालातील खरेदी अधिकाऱ्यांबरोबर हितसंबंध नसल्याबाबत आणि एकच निविदा दिल्याबाबतचे हमीपत्र दरपत्रकासोबत द्यावे.

७. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपुर्ण प्रक्रिया पुर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार, हे कार्यालय राखून ठेवत आहे.

...............................२

८. दरपत्रके दि. १२.०६.२०१७ (सोमवार) रोजी सकाळी ११:०० वाजता अपर पोलीस अधिक्षक (मु.) यांच्या दालनात उघडण्यात येतील.

९. दरपत्रके स्विकारल्याबाबतचा अंतिम निर्णय या कार्यालयाचे विभाग प्रमुख यांचा राहील.

१०. दरपत्रक स्विकृती तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध (valid) राहील.

३०/५/१७

( वसंत देवरकर )
अपर पोलीस अधीक्षक (मुख्यालय),
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
म.राज्य, मुंबई यांचेकरीता.

प्रति,

सर्व इच्छूक कंपन्या.